# प्रेस नोट

## प्रशिक्षण ही केवळ पूर्वतयारी नाही, तर प्रशासकीय परिपूर्णतेचा पाया – डॉ. अभिजीत चौधरी

### - बालेवाडीत 'पीएमआरडीए'च्या नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा पायाभूत प्रशिक्षण वर्ग
### - 'स्पंदन २०२६' सांस्कृतिक संध्येत कर्मचाऱ्यांच्या कलागुणांचा बहारदार आविष्कार!

पुणे : "केवळ स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासनात प्रभावी काम करता येत नाही, तर त्यासाठी प्रशिक्षण अत्यंत गरजेचे असते. प्रशिक्षणातूनच कौशल्यपूर्ण कामाचा पाया मजबूत होतो," असे प्रतिपादन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) 'पीएमआरडीए'मध्ये नवनियुक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पायाभूत प्रशिक्षण वर्गास त्यांनी आज (दि. २७) बालेवाडी येथील हॉटेल सदानंद रीजन्सी येथे भेट देऊन मार्गदर्शन केले. 'यशदा'च्या राज्य नागरी विकास संस्थेमार्फत या विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

नव्याने दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना माहितीचा अधिकार (आरटीआय), शासकीय सेवा, प्रशासकीय कायदे आणि शासकीय खरेदी प्रक्रिया (GeM/E-Tendering) या तांत्रिक व कायदेशीर बाबींचे सखोल ज्ञान असणे अनिवार्य असल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले. या सर्वसमावेशक प्रशिक्षणामुळे प्राधिकरणाची 'संस्थात्मक कार्यस्मृती' (इन्स्टिट्यूशनल मेमरी) समृद्ध होऊन दैनंदिन कारभारात गतिमानता व पारदर्शकता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी 'पीएमआरडीए'च्या प्रशासन विभागाच्या सहआयुक्त रूपाली आवले-डंबे यांनी, "ज्ञान हीच खरी शक्ती आहे. त्यामुळे स्वतः ज्ञानवंत होऊन प्राधिकरणाच्या विकासासाठी योगदान द्या," असा सल्ला नवनियुक्त कर्मचाऱ्यांना दिला.

या प्रशिक्षण उपक्रमादरम्यान प्रशिक्षणार्थींच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी 'स्पंदन २०२६ — आठवणींचे रंग, कलेचा तरंग' या सांस्कृतिक संध्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वैष्णवी खोलणे व निर्मल आहेर यांनी गणेशवंदना, तर धनंजय रनजकर यांनी नृत्य सादर केले. सुदर्शन चव्हाण, अश्विनी पवार, आदिती शिंदे, सौरभ स्वामी आणि निर्मल आहेर यांनी बहारदार काव्यवाचन व शेरोशायरी सादर केली.

सहआयुक्त रूपाली आवले-डंबे यांनी स्वलिखित कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. निर्मल आहेर व प्रणित हवाळे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले, तर रोहन शिंदे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. या प्रसंगी उपायुक्त राजेश माशेरे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन व समन्वय 'यशदा'च्या सत्र संचालक स्वाती कामत, सहसत्रसंचालक व्यंकटेश कल्याणकर आणि फॅसिलिटेटर आनंद भागवत यांनी केले.

---

पुरुषोत्तम सांगळे, माहिती व जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए